# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०३/२०२५ (गुरूवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०५/०३/२०२५ रोजी उमरेड पोलीस हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बायपास चौक, उमरेड येथे नाकाबंदी केली असता ,संशयीत टिप्पर क्रं.एम.एच. ३३ क्यू ००३६ मिळुन आले. पोलीसांनी वाहनाला थांबवुन तपासणी केली असता सदर वाहनात रेती मिळुन आली. वाहन चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव विक्की वसंतराव मेश्राम ,वय २९ वर्षे, रा. चिमनाझरी, ता. उमरेड असे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन **१)** ०७ ब्रास रेती किंमती ३५,०००/— रूपये **२)** टिप्पर क्रं.एम.एच. ३३ क्यू ००३६ किंमती २०,००,०००/— रूपये असा एकुण २०,३५,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

टिप्पर चालक विक्की वसंतराव मेश्राम, वय २९ वर्षे, रा. चिमनाझरी, ता. उमरेड **याच्या** विरूध्द **कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान,सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम सहकलम १३०,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# काटोल उपविभागाअंतर्गत पोलीस स्टेशन काटोल हद्दीत काढण्यात आली बेटी बचाओ बेटी पढाओ जनजागृती रॅली

बेटी बचाओ बेटी पढाओ या उपक्रमाला १० वर्षे पुर्ण झाल्याने मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात काटोल उपविभागात दिनांक ०६/०३/२०२५ रोजी काटोल येथे बेटी बचाओ बेटी पढाओ जनजागृती रॅली काढण्यात आली होती. सदर रॅली श्री बापु रोहोम ,उपविभागिय पोलीस अधिकारी ,काटोल यांच्या नेतृत्वात काढण्यात आली. सदर रॅली मध्ये श्री निशांत मेश्राम, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन काटोल तसेच पोलिस स्टेशन काटोल चे अधिकारी आणि अंमलदार यांच्या सह **नगर परीषद, शाळा क्रमांक २, काटोल येथील विद्यार्थीनी, शिक्षक वृंद सहभागी झाले होते. सदर रॅली काटोल शहरातील प्रमुख मार्गाने काढण्यात आली होती.**




उपविभागीय पोलीस अधिकारी
कार्यालय उपविभाग काटोल
नागपूर ग्रामीण पोलीस
बेटी बचाओ, बेटी पढाओ
जनजागृती रॅली
पोलीस ठाणे, काटोल
नागपूर ग्रामीण पोलीस
भ्रुणहत्या पाप आहे.
बेटी बचाओ बेटी पढाओ
मुलगी शिकली प्रगती झाली
गर्भलिंग तपासणी कायद्याने गुन्हा आहे
जनजागृती रॅली


महाराष्ट्र पोलीस
उपविभागीय पोलीस अधिकारी
कार्यालय उपविभाग काटोल
नागपूर ग्रामीण पोलीस
बेटी बचाओ, बेटी पढाओ
जनजागृती रॅली